


# । सामना चिकुनगुन्याच्या संधिवाताचा ।

**डॉ. श्रीकान्त वाघ**

चिकुनगुन्या म्हणजे रोग्याला वाकवून टाकणारा आजार. आशिया–आफ्रिका खंडातल्या संधिवाताच्या ज्या विषाणूंमुळे तो होतो त्यांची तीव्रता आनुवंशिक बदलांमुळे वाढत चालली आहे. म्हणून या आठवडाभरात बऱ्या होणाऱ्या आजाराची गंभीर दखल घेतली जायला हवी.

विषाणूंमुळे सांध्यांच्या आतल्या आवरणाला (सायनोव्हियम) सूज येऊन चिकुनगुन्या होतो. नाकात व्हायरसमुळे पडसे येते तसे. १९५३ मध्ये टांझानिया आणि मोझांबिक देशाच्या सीमेवरील मकोन्डे पठारावर हा आजार प्रथम सापडला. मकोल्डे भाषेतल्या 'कुन्गुन्याला' या क्रियापदावरून हा शब्द तयार झाला. चिकुनगुन्या म्हणजे रोग्याला वाकवून टाकणारा आजार. या आजाराचे काही रोगी १९६३–६४ मध्ये चेन्नई आणि कोलकाता येथे आढळले. पुन्हा १९७३ मध्ये बार्शीत ही साथ आली. त्यानंतर नोव्हेंबर २००५ पासून भारतात आलेली साथ महाभयंकरच म्हटली पाहिजे. संपूर्ण दक्षिण भारत आणि महाराष्ट्रात १२ पेक्षा अधिक राज्यात लाखो लोकांना या रोगाची लागण झाली. एकेका घरातले सारे जण तर कधी अर्धेअधिक गाव एकाच वेळी आजारी पडले. बहुतेकांची जवळपास आठवडाभराची रोजीरोटी बुडाली. दोन वर्षे उलटल्यानंतरही ही साथ अजून सुरूच आहे. अलिकडेच मे महिन्यात केरळातल्या कासारगोड जिल्ह्यात पुन्हा चिकुनगुन्याचे रोगी आढळले.

## चिकुनगुन्याचा डास

चिकुनगुन्या हा आशिया–आफ्रिका खंडातला संधिवाताचा विशेष व्हायरस. अमेरिका–ऑस्ट्रेलियात वेगळे व्हायरस असतात. ते सांध्यांमध्ये आणि आजूबाजूला वाढतात. या व्हायरसमधल्या आनुवंशिक बदलांमुळे चिकुनगुन्याची तीव्रता वाढत चालल्याचे दिसते. चिकुनगुन्या व्हायरस एडिस इजिप्ती नावाच्या डासामध्ये वाढतो. जागतिक तापमानवाढीमुळे हा डास पुन्हा कार्यरत झाला आहे. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो स्वच्छ पाण्यात वाढतो आणि दिवसा विशेषत: सकाळ–संध्याकाळी चावा घेतो. मलेरियाचा डास घाणेरड्या पाण्यात वाढतो. रात्री चावतो आणि एकाच व्यक्तीचे रक्त पिऊन पोट भरतो. एडिस इजिप्ती अनेक लोकांचे थोडे–थोडे रक्त पितो. त्यामुळे एका वेळी एकाच घरातली अनेक मंडळी आजारी पडतात. याच डासामुळे डेंग्यु, हत्तीरोग, पीतज्वर (काविळ) असे रोगही पसरतात. त्यामुळे एकाच वेळी हे सर्व आजार फैलावतात आणि काहींना दोन–दोन आजार होण्याची शक्यता असते. डासाच्या चाव्यानंतर चार–पाच दिवसात चिकुनगुन्याची लक्षणे दिसतात.

## लक्षणे

अचानक थंडी वाजून ताप येऊन सर्व सांधे आखडणे हे चिकुनगुन्याचे प्रमुख लक्षण. कधीकधी ताप उतरतो आणि पुन्हा येतो. कधी त्वचेवर हलकेसे पुरळ उठते. क्वचित तेथे खाज सुटते आणि कधी त्वचेखाली रक्तस्रावही होऊ शकतो. काही रोग्यांचे डोके दुखते. भूक मंदावते, मळमळते आणि डोळे लालसर होतात.

संधिवातामुळे बोटांची पेरे, मनगट, घोटे आणि क्वचित गुडघ्याचे सांधे सुजतात आणि रोग्याला अगदी वाकवून टाकतात. थोड्याशा हालचालीने सांधे सैल होतात. पण वेदनेमुळे रोगी अगदी बेजार होऊन जातो. हालचाल करता येत नाही. चिकुनगुन्या बहुधा १५ ते ४५ वयाच्या कष्टकरी,

**डॉ. श्रीकान्त वाघ – ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट**
एम.बी.बी.एस. (मुंबई), एम.डी. (मेडिसिन), एम.एस्सी. ऱ्हुमॅटॉलॉजी (युके), बी.ए.एम.एस., एम.ए.एस्सी. (चिकित्सा), एम.ए. (संस्कृत) एम.ए. (संगीत)
**तेजस अपार्टमेंट्स, १०७८ शुक्रवार पेठ, टिळक रस्ता, हिराबाग, पुणे ४११ ००२.**
● फोन : (०२०) २४४७ ८९९३, ९७६३४ ०७२२९, ८४४६४ ०५०५०
● Email : sywagh@yahoo.co.in ● Web : www.arthritis-india.com ● You Tube : Dr. Shrikant Wagh

अल्प उत्पन्न गटाच्या लोकांत आढळतो. दहा–पंधरा दिवसांच्या दुखण्यात कामावर जाता न आल्याने त्यांच्या हलाखीत आणखीनच भर पडते. लहान मुलांचा चिकुनगुन्या बहुधा सौम्य असतो. पण पक्षाघात, संधिवात, पार्किन्सन–सारख्या आजाराच्या रोग्यांमध्ये तसेच वृद्धांमध्ये हा आजार झाला, तर त्यांचे अतिशय हाल होतात. एकदा चिकुनगुन्या झाला की शरीरात आपोआपच प्रतिकारक्षमता येते आणि पुन्हा हा आजार होत नाही.

## संधिवाताच्या अवस्था

काही लोकांना विषाणूचा काहीच त्रास होत नाही. चिकुनगुन्या संधिवात सामान्यत: दोन–तीन दिवसात किंवा फारतर आठवडाभरात बरा होतो. अर्ध्या अधिक रोग्यांचे दुखणे सहा महिन्यातून जास्त काळ सुरू राहते. सुमारे १२% लोकांचा संधिवात दीडएक वर्षानंतरही तसाच राहतो. यात मुख्यत: बोटांची पेरे, मनगट आणि घोट्याजवळ सूज राहते आणि दुखते. ही सूज कधी गाठीसारखी दिसते. आमवातासारखा (ऱ्हुमॅटॉइड) कडकपणा मात्र नसतो. वेदनाशामक औषध घेतले की, तात्पुरते बरे वाटते. या प्रदीर्घ अवस्थेत रक्ताच्या एलिसा (IgM) सारख्या महागड्या तपासण्या दोष दाखवतीलच असे नाही.

## उपद्रव

चिकुनगुन्या हा सर्दीसारखा आठवडाभरात बरा होणारा आजार असला तरी सुरूवातीच्या दिवसात मेंदूची सूज (बेहोषी, भ्रम, फिट्स, अर्धांगवायु) मज्ञातंतूंचे दोष (मुठी वळता न येणे, अंधत्व) मूत्रपिंडाची कार्यक्षमता कमी होणे, रक्तस्राव असे उपद्रवही दिसून आले आहेत. हिंदी महासागरातल्या फ्रेंच रियुनियन बेटावर अडीच लाख चिकुनगुन्या रोग्यांपैकी दोनएकशे दगावले. यात कदाचित इतर विषाणूही असतील, तर कदाचित औषधांचे दुष्परिणामही. पण चिकुनगुन्या हा इतका साधा आजार नाही, हे मात्र खरे. ज्यांचा संधिवात महिनोन्महिने टिकून राहतो, त्यांनाही फार त्रास होतो. १५ वर्षे सांधेदुखी सुरू राहून सांध्यांचा नाश झाल्याच्याही केसेस आहेत.

## उपचार

बहुतांश रोगी साध्या वेदनाशामक औषधांनी सुधारतात. काही डॉक्टर मंडळी स्टिरॉइड्स वापरताना दिसतात. पण ते योग्य नाही. चिकुनगुन्याच्या जुनाट संधिवातासाठी क्लोरोक्विनच्या वापराचे संदर्भ आहेत; पण त्याचा विशेष उपयोग दिसत नाही. हल्ली ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट मंडळी, मेथोट्रेक्सेट, लेफ्लुनामाइड अशी ऱ्हुमॅटॉइड–आमवाताची औषधे त्यासाठी वापरू लागली आहेत. अर्थात त्यासाठी स्पेशालिस्टचा सल्ला आवश्यक आहे.

## प्रतिबंध

चिकुनगुन्यासाठी कोणतीही लस उपलब्ध नाही, त्यामुळे साथीच्या काळात अळ्यांचा नाश आणि डासांचा प्रतिकार हाच प्रतिबंधाचा मार्ग आहे. हा डास रात्री चावत नसल्यामुळे मच्छरदाणीचा उपयोग होत नाही. दिवसा अंगभर कपडे घालावेत, उघड्या त्वचेवर कडुलिंबाचे तेल (ओडोमॉस) लावावे. स्वच्छ पाणीही उघडे साठणार नाही (कूलर, फुलदाणी, कुंड्या, डबे, बाटल्या, प्लॅस्टिक पिशव्या, टायर, नारळाच्या करवंट्या) असे पाहावे. डासांच्या नियंत्रणासाठी शासकीय सूचना कटाक्षाने पाळाव्यात.

❖ ❖ ❖

**सौजन्य : सकाळ (फॅमिली डॉक्टर) जून २००८**